२९ ऑगष्ट २०१९ राष्टीय क्रीडा दिन तसेच मेजर ध्यानचंद हॉकी चे जादुगर यांचे जयंती निमीत्त महाविद्यालयात क्रीडा दिनाचे औचित्त साधुन शारिरीक शिक्षण खेळ व क्रीडा विभागाच्या वतीने व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे,प्रा. डॉ. राजेंद्र घोनमोडे, शारिरीक शिक्षण विभागाचे प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे क्रीडा समीतीचे प्रियदर्शन गणवीर उपस्थित होते. तसेच व्याख्याना करीता आदर्श महाविद्यालय वडसा येथील डॉ. राजु चावके यांना बोलविण्यात आले होते त्यांनी विद्यार्थ्यांना खेळा विषयी मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व खेळांचे खेळाडु उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे तर आभार प्रा प्रियदर्शन गणविर यांनी मानले.

लोकमत – 01/09/18



### महात्मा गांधी महाविद्यालयात क्रीडा दिन

आरमोरी : हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून बुधवारी स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे होते. यावेळी डॉ. राजेंद्र घोनमोडे, डॉ. राजू चावके, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. गंगाधर जुआरे, डॉ. अमिता बन्नोरे, डॉ. राजेंद्र चव्हाण, प्रा. प्रियदर्शन गणवीर उपस्थित होते. डॉ. रमेश ठोंबरे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्यावर विचार व्यक्त केले. यशस्वीतेसाठी डॉ. विजय रेवतकर, डॉ. गजेंद्र कढव, प्रशांत दडमल, डी. जी. हेमके, मधुकर चापले, सोनाली हेमके, माधुरी धोटे, रूपेश मेश्राम, अश्विनी मडावी, रोहिणी जुवारे व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late,N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ दिक्षा तिजारे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रासकंट्री दौड स्पर्धेत सहभाग

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या **क्रॉसकंट्री** संघात आमच्या महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. दिक्षा देवाजी तिजारे हिची निवड झाली होती. तीने गोडवाना विद्यापीठाच्या संघातर्फे मागील दोन वर्षापासुन प्रतिनीधीत्व केले आहे. दि. ४ आक्टोंबर, २०१८ ला झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ **क्रॉसकंट्री दौड** स्पर्धेत, गुलबर्गा विद्यापीठ, कलाबुर्गी, गुलबर्गा येथे तीने गोडवाना विद्यापीठाच्या संघातर्फे सहभाग घेतला होता.

गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन **क्रॉसकंट्री** स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केल्याबद्दल पुष्पगुच्छ देतांना गोंडवाना विद्यापीठ शारिरीक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अनिता लोखंडे, प्राचार्य डॉ. कुकरेजा, डॉ. लोमदेव नागलवाडे यांचेहस्ते पुष्पगुच्छ स्विकारतांना महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. दिक्षा देवाजी तिजारे, प्रां. ज्ञानेश्वर ठाकरे व महाविद्यालयीन खेळाडु







दैनिक लोकमत दि. 26/10/2018



दीक्षा तिजारे

आरमोरी : येथील महात्मा गांधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी दीक्षा देवाजी तिजारे हिची गोंडवाना विद्यापीठाच्या क्रॉस कंट्री संघात निवड झाली. त्याबद्दल प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.

M.G Arts, Science & Late N.P.Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.R.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## ❖ गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन महिला बास्केटबॉल स्पर्धेत महाविद्यालय द्वितीय

गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत नेवजाबाई हितकारीणी महाविद्यालय ब्रम्हपुरी येथे झालेल्या गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन महिलाबास्केटबॉलस्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीनेद्वितीयक्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयाच्यासंघातर्फे पायल सपाटे, पूजा सोरते, पूजा दुमाने, पूजा बोंदरे, प्रियंका नखाते, भारती चोपकार, अश्विनी तोरणकर, प्रगती टेंभूर्णे, वैशाली टिचकुले, पूजा सपाटे, नेहा ढोरे आदी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. संघातर्फेसर्वच सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी केली. त्यात पूजा सोरते, पायल सपाटे आणि पूजा बोंदरे यांनी विशेष कामगिरी करून संघाला अंतिम सामन्यापर्यंत पोहचवले व अंतिम सामन्यात संघाला द्वितीय स्थान प्राप्त झाले.







आंतर महाविद्यालयीन महीला बॉस्केटबॉल स्पर्धेचे द्वितीय क्रमांकाचे बक्षिस वितरण करतांना नेवजाबाई हितकारणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कोकोडे, प्रा. डॉ. शेकोकर, डॉ. नागलवाडे, प्रा. गिल मॅडम व बक्षिस स्विकारतांना महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरीचे प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे व बॉस्केटबॉल खेळाडु

## ❖ गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन महिला हॉकी स्पर्धेत प्रथम

दि. ११/१०/२०१८ रोजी गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत सर्वोदय महाविद्यालय, सिंदेवाही येथे झालेल्या गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन महिला हॉकी स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयाच्या संघातर्फे सोनाली हेमके, रोहिनी जुआरे, अश्विनी गोंदळे, जयश्री गोंदोळे, माधुरी धोटे, प्रियंका दुमाने, पायल करांडे, प्रगती सेलाकर, आंचल डोनाडकर, अश्विनी सेलोकर, पायल मने आदी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या संघाने डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपुर विरुध्द ५–०, सर्वोदय महाविद्यालय सिंदेवाही विरुध्द ३–० आणि नेवजाबाई हितकारीनी विरुध्द झालेल्या अत्यंत चुरशिच्या अंतीम सामन्यात अश्विनी गोंदोळे हिने १ गोल करून महाविद्यालयाला अंतीम सामन्यात १–० ने विजयी मिळवून दिला.













दैनिक लोकमत समाचार दि. 16/10/2018


गांधी कॉलेज की हॉकी टीम बनी विजेता

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

❖ **महात्मा गांधी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी ॲथलेटीक्स स्पर्धेत केली १८ पदकांची लूट**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत स्पोर्टस् कॉम्पलेक्स, गडचिरोली येथे दि. ८ते १० ऑक्टों.२०१८ला आयोजित गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन वार्षिक ॲथेलेटिक्स स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथील कु. दिक्षा तिजारे, कु. सोनाली हेमके, कु. रोहीणी जुआरे,पायल सपाटे, पायल करांडे, भाग्यश्री सोनवाने, माधुरी धोटे, महेंद्र मने,अनुप नैताम, स्वप्निल डांगे,धनीराम पदा, सारंग जांभुळे, सुरज फुकटे, विशाल जौंजाळकर, उत्तम वड्डे आदी विद्यार्थ्यांनी स्पर्धेत लक्षणीय कामगिरी करून विविध पदक प्राप्त केले. त्यात वैयक्तिक क्रीडा स्पर्धेत कु. दिक्षा तिजारे हिने ८००मि.(२:४२:०८), १५००मि.(०५:५७:३०) आणि ५०००मि. (२१:२२:०४)वेळ नोंदवूनतीन सुवर्ण पदक प्राप्त केले. तसेच सांघिक रिले प्रकारात ४x१००मि. रिले आणि ४x४००मि.रिले प्रकारात सुध्दा सुवर्ण पदक मिळवून दिले आहे महिलांमध्ये सर्वात जास्त पदक प्राप्त करणारी ती ॲथलिट आहे.

कु. सोनाली हेमके हिने १०० मीटर दौड स्पर्धेत १५:५२:०२ सेकंद वेळ नोंदवून रौप्य पदक प्राप्त केले व २००मि मीटर दौड स्पर्धेत ३२:०२:०२ सेकंद वेळ नोंदवून सुवर्ण पदक मिळविले.कु. भाग्यश्री सोनवाने हिने १००मीटर दौड स्पर्धेत १५:२५:०३ सेकंद वेळ नोंदवून सुवर्ण पदक प्राप्त केलेतसेच रोहिनी जुआरे हिने २००मीटर दौड स्पर्धेत ३४:७८ सेकंद वेळ नोंदवून कांस्य पदक प्राप्त केले.कु. पायल करांडे हिने ८०० मीटर दौड स्पर्धेत ०३:६६:७२वेळ नोंदवुन कांस्य पदक प्राप्त केले, तसेच अनुप नैताम याने गोळाफेक या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केले. स्वप्निल डांगे याने लांब उडीमध्ये कांस्य पदक प्राप्त केले तसेच पायल सपाटे हिने गोळाफेक मध्ये चतुर्थ क्रमांक मिळविला.

सांघिक रिले या खेळ प्रकारात ४x१०० मीटर रिले स्पर्धेमध्ये कु. सोनाली हेमके, कु. भाग्यश्री सोनवाने, कु. दिक्षा तिजारे, कु. रोहिणी जुआरे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. तसेच ४x४०० मीटर स्पर्धे मध्ये सुध्दा कु. दिक्षा तिजारे, कु. माधुरी धोटे, कु. पायल करांडे, व भाग्यश्री सोनवाने यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन वार्षिक ॲथेलेटिक्स स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळ व क्रीडा विभागातील विद्यार्थ्यांनी एकूण १४ सुवर्ण, १ रौप्य व ३ कांस्य पदक प्राप्त करून महाविद्यालयाला लौकिक प्राप्त करून दिला. शारिरीक शिक्षण आणि क्रीडा विभागाचे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, आणि सहायक प्रशिक्षक मधुकर चापले यांनी कोच व प्रशिक्षक म्हणुन कार्य केले










PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI Distt.Gadchiroli






























M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College ✶ Armori ✶

PRINCIPAL
M.G.Arts Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

# Athletics Award Ceremony




100 mtr. Ist



200 Mtr. Ist & III rd




800 Mtr. Ist & III rd




1500mtr. 1st



5000mtr. 1st



Relay 400x400 & 4x100 mtr. 1st Place



Shotput 1st





Long Jump 3rd



दैनीक देशोन्नती दि. 4/12/2018



## म.गांधी महाविद्यालयातील खेळाडूंची विद्यापीठ संघात निवड

तालुका प्रतिनिधी/३ डिसेंबर

आरमोरी : स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयातील दिक्षा तिजारे, सोनाली हेमके, रोहणी जुआरे, माग्यश्री सोनवाने गोंडवाना विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स संघात निवड झाली आहे.

या खेळाडू १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, ५००० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष किशोर वनमाळी, संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ.लालसिंग खालसा, प्रा.ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा.प्रियदर्शन गणवीर यांनी अभिनंदन केले आहे.

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late,N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

## ❖ सी.एम चषक खो–खो (महिला /पुरुष) स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालय उपविजेता

सी एम चषक अंतर्गत आदर्श महाविद्यालय वडसा येथे दि. १९/१२/२०१८ रोजी झालेल्या खो–खो महिला स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयीन संघाचे व्यवस्थापक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांच्या संघातर्फे रोहीनी जुआरे, माधुरी धोटे, पायल करांडे, गौरी पुंगाटी,प्रतिभा वरखडे, मयुरी राउत,वैशाली प्रधान, जागृती राउत, अश्विनी मडावी,अंकीता गरफडे आदी विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. संघातर्फे सर्वच सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी केली. त्यात रोहीनी जुआरे, पायल करांडे आणि वैशाली प्रधान यांनी विशेष कामगिरी करून संघाला अंतिम सामन्यापर्यंत पोहचवले व अंतिम सामन्यात संघाला उपविजयी करुन दिले.

सी एम चषक अंतर्गत आदर्श महाविद्यालय वडसा येथे दि. १९/१२/२०१८ रोजी झालेल्या खो–खो **(पुरुष)** स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. महाविद्यालयाच्या संघ व्यवस्थापक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांच्या संघातर्फे मनोज हजारे,मधुकर चापले, शुभम जुआरे, आशिष सुर्यवंशी, आशिक सावकाकडे, आकश उईके, गरीब मडावी,रुपेश मने, सौरभ श्रीरामे,शुभम धुर्वे आणि विजय आदी विद्यार्थ्यांनी  सहभाग घेतला. संघातर्फे सर्वच सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी केली. त्यात मनोज हजारे, मधुकर चापले आणि आशिक सावसाकडे यांनी विशेष कामगिरी करून संघाला उपविजयी पदाचा मान मिळवून दिला.









M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

# 'युवारंग – क्रीडा व सांस्कृतिक' महोत्सवाचे थाटात उद्‌घाटन व समारोप

दि. २९/०१/२०१९ विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळविण्यासाठी क्रीडा व सांस्कृतिक सम्मेलनाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांनी कलेविषयी न्युनगंड न बाळगता सकारात्मकतेने कला क्षेत्रात पुंढे यावे. सांस्कृतिक सम्मेलन हे कला विकासाला चालना देणारे व्यासपीठ होय असे प्रतिपादन मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. किशोरभाऊ वनमाळी यांनी महात्मा गांधी महाविद्यालयातील क्रीडा व सांस्कृतिक सम्मेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षीय मनोगतातून केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रमात उद्‌घाटक म्हणून 'रमाई' फेम झाडीपट्टीचे प्रसिद्ध नाटयकलावंत व गायक मा. श्री. अजीतकुमार खोब्रागडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून झाडीपट्टीतील प्रख्यात 'नानाची टांग' फेम प्रसिद्ध अभिनेते मा. श्री. अविनाश पाटील, झाडीपट्टीतील प्रसिद्ध नाट्यकलावंत कुमारी टिना, ज्येष्ठ नाट्यकलावंत मा. गणपतराव वडपल्लीवार, सामाजिक कार्यकर्ते मा. हरीपालजी खोब्रागडे, संस्थेचे पदाधिकारी मा. नामदेवरावजी सोरते, मा. उमाकांतजी वनमाळी, मा. दीपकजी बेहरे, मा. नुरअल्लीभाई पंजवानी, मा. हरिश्चंद्रजी बोंदरे सोबतच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शशीकांत गेडाम, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, युवारंग विद्यार्थी प्रतिनिधी श्री. गुरूनानक शिवरकर आदी मंचावर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना मा. किशोरभाऊ वनमाळी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी झाडीपट्टीतील नाट्यकलावंत मा. श्री. अजीतकुमार खोब्रागडे, मा. श्री. अविनाश पाटील आणि कुमारी टिना यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असे मनोगत व्यक्त केले आणि काही नाटयसंवाद व कला सादर करून दाखविले आणि विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रात नावलौकिक करण्यासाठी भरपूर संधी असल्याचे सांगितले. याप्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत 'शब्दशिल्प' वार्षिकांकाचे विमोचन करण्यात आले. महाविद्यालयातील प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव मिळण्यासाठी युवारंग सारख्या कार्यक्रमाचे महाविद्यालयात नेहमीच आयोजन केले जात असल्याचे सांगितले व आयोजनाची भूमिका विशद केली तसेच कला सादरीकरणाची संधी मिळाल्यास संधीचा अवश्य लाभ घ्या, असे आवाहन केले. समारंभाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. सीमा नागदेवे यांनी केले तर आभार प्रा. शशीकांत गेडाम यांनी मानले.

'युवारंग २०१९' चा शुभारंभ विविध क्रीडास्पर्धेने झाला त्यात १०० मी. दौड, क्रिकेट, डॉजबॉल अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता. यात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. युवारंग तीन दिवस चालणार असून दरम्यान विविध क्रीडा स्पर्धा तसेच वादविवाद, समूहनृत्य, एकपात्री अभिनय, एकांकिका, समूह गीत, प्रश्नमंजुषा, फॅशन शो, ऑर्केस्ट्रा अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शशीकांत गेडाम, सांस्कृतिक विभागाचे सदस्य प्रा. पराग मेश्राम, डॉ. विजय रैवतकर, प्रा. गजानन बोरकर, क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, डॉ. मनोज ठवरे, प्रा. डॉ. विशाखा वंजारी, प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. जयेश पापडकर, प्रा. छगन मुंगमोडे, रा.से.यो. चे प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, डॉ. उत्तमचंद कांबळे, डॉ. विजय गोरडे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. नोमेश मेश्राम, प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रा. डॉ. वसंता कहालकर, प्रा. डॉ. गजेंद्र कढव तसेच समस्त प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पंजवानी वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि खेळाला प्रोत्साहन आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवारंग क्रीडा व सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन दि. २८ ते ३१ जानेवारी २०१८ पर्यंत करण्यात आले होते. या संमेलनाचा समारोप समारंभ नुकताच पार पडला. या समारोप समारंभाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रमुख अतिथी प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. शशीकांत गेडाम, आय. क्यु. ए. सी. समन्वयक प्रा. नोमेश मेश्राम, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

तीन दिवस साजरा करण्यात आलेल्या युवारंगचा शुभारंभ विविध क्रीडा स्पर्धेने झाला. त्यात १०० मीटर दौड स्पर्धा, डॉज बॉल, क्रिकेट, डिश डेकोरेशन, पुष्परचना, रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धांचा समावेश होता. या संमेलनात विद्यार्थ्यांच्या

कल्पकतेला चालना मिळणार असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यात प्रामुख्याने 'राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटना असाव्यात की नसाव्यात' या विषयावर वादविवाद स्पर्धा, एकलनृत्य स्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा, समूहनृत्य स्पर्धा, समूह गीतगायन स्पर्धा, इंडोवेस्टर्न संस्कृतीचा प्रत्यय देणारे फॅशन शो, आनंद मेळावा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सध्याच्या सामाजिक, राजकीय वास्तवाचे भान देणारे, राष्ट्रीय एकात्मतेचा प्रत्यय देणारे समाजजागृतीपर एकांकिकांनी प्रेक्षकांचे मन हेलावून टाकले, रंगतदार नृत्यांनी प्रेक्षकांचे मन जिंकले. फॅशन शो हे आकर्षणाचे केंद्र होते. ऑर्केस्ट्राद्वारे विद्यार्थ्यांनी बहारदार गीत सादर करून सर्वांचेच मन जिंकले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी युवारंग क्रीडा व सांस्कृतिक संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केले व विद्यार्थ्यांनी विविध कलेच्या क्षेत्रात आपल्या प्रतिभेने पुढे येण्याचे आवाहन केले. कलाक्षेत्रात पुढे येण्याचे युवारंग हे सुंदर कलापीठ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी उपस्थितांची समयोचित भाषणे झालीत.

संचालन प्रा. खगेश सहारे, प्रा. अविनाश बांबोळे यांनी केले तर आभार प्रा. शशीकांत गेडाम यांनी मानले. युवारंग क्रीडा व सांस्कृतिक संमेलनाच्या यशस्वी आयोजनाकरिता सांस्कृतिक विभागाचे सदस्य, क्रीडा विभागातील सदस्य, महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.









सांस्कृतिक संमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलाविकासाला चालना देणारे व्यासपीठ

किशोर वनमाळी यांचे प्रतिपादन ◆ 'युवारंग- क्रीडा व सांस्कृतिक' महोत्सवाचे थाटात उद्घाटन

## ❖ शारिरीक क्षमता चाचणी व वैद्यकीय शारिरीक तपासणी अहवाल

महाविद्यालयात दि. ७ फेब्रुवारी ते १२फेब्रुवारी २०१९ या कालावधीत महाविद्यालयातील महीला ३४३ व पुरुष १७० असे एकुण ५१३ विद्यार्थ्यांची शारिरीक क्षमता चाचणी व वैद्यकीय शारिरीक तपासणी घेण्यात आली आहे.

वैद्यकीय शारिरीक तपासणी करीता डॉ. सतीश निमजे यांना बोलविण्यात आले होते त्यांनी एकुण ५१३ विद्यार्थ्यांची शारिरीक तपासणी केली. तसेच त्याचा अहवाल २ प्रतीत गोंडवाना विद्यापीठाला पाठविण्यात आला आहे.












## ❖ २२ वी महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव मुंबई विद्यापीठ, मुबई

२२ वी महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सव मुंबई विद्यापीठ मुबई येथे दि १२ फेब्रुवारी ते १९ फेब्रुंवारी २०१९ या कालावधीत मुबई विद्यापीठाने आयोजीत केल्या होत्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील १३ खेळाडुंची निवड झाली होती. त्यांनी गोंडवाना विद्यापीठातर्फे विवीध खेळातील संघाचे प्रतिनीधीत्व केले आहे

| Sr. No. | Name of Player | Class | Events |
|---|---|---|---|
| 1 | Manoj Raju Hajare | MA. Ist | Kho-Kho |
| 2 | Sonali Anil Hemke | MA. Ist | Kho-Kho |
| 3 | Rohini Anil Juare | B.Sc. III | Kho-Kho |
| 4 | Pooja Nilkanth Sorte | B.Sc.I | Basketball |
| 5 | Payal Diwakar Sapate | M.Sc.II | Basketball |
| 6 | Diksha Devaji Tijare | B.A.III | Athletic |
| 7 | Sonali Anil Hemke | M.A. Ist | Athletic |
| 8 | Bhagyashri Fattu Sonawane | B.A.Ist | Athletic |
| 9 | Madhuri Ramchandra Dhote | B.Sc.III | Athletic |
| 10 | Payal Ambadas Karande | B.Com. I | Athletic |
| 11 | Rohini Anil Juare | B.Sc. III | Athletic |
| 12 | Pooja Bondre | M.Sc.II | Volleyball |
| 13 | Anup Naitam | B.A.III | Athletic |

दैनीक लोकमत दि. 7/3/19

# एमजी कॉलेजचे विद्यार्थी विद्यापीठ संघात

**चार संघामध्ये समावेश :** राज्यस्तरीय क्रीडा महोत्सवात मिळविले होते यश

लोकमत न्यूज नेटवर्क

आरमोरी : स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयाच्या खेळाडूंची ॲथलेटिक्स, खो-खो, कबड्डी आणि बॉस्केटबॉल खेळात गोंडवाना विद्यापीठ महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून संघात निवड झाली आहे.

महाराष्ट्र क्रीडा महोत्सव मुंबई येथे पार पडलेल्या २२ व्या आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत महाविद्यालयातील अनेक खेळाडू सहभागी झाले होते. महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विभागाचे प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांची गोंडवाना विद्यापीठातील खो-खो पुरुष संघाचे कोच व



विद्यापीठ संघात निवड झालेल्या खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा तसेच मार्गदर्शक शिक्षक.

प्रशिक्षक म्हणून निवड झाली होती. तसेच गोंडवाना विद्यापीठातील ॲथलेटिक्स महिला संघात दीक्षा तिजारे, भाग्यश्री सोनवाने, पायल कराडे व अनूप नैताम यांची निवड झाली.

खो-खो पुरूष संघात मनोज हजारे, खो-खो महिला संघात सोनाली हेमके, रोहिणी जुआरे, कबड्डी संघात माधुरी धोटे, बॉस्केटबॉल महिला संघात पायल सपाटे, पूजा सोरते, व्हॉलिबॉल महिला संघात पूजा बोंद्रे या खेळाडूंनी गोंडवाना विद्यापीठ संघातर्फे सहभाग घेतला होता.

२२ व्या महाराष्ट्र क्रीडा महोत्सव स्पर्धा मुंबई येथे सहभाग घेतलेल्या सर्व खेळाडूंचे मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर वनमाळी, संस्थेचे सदस्य, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, शारीरिक शिक्षण आणि खेळ व क्रीडा विभागाचे संचालक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, क्रीडा विभागाचे सदस्य प्रा. प्रियदर्शन पगवीर, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.



Right Place For Bright Future

Manoharbhai Shikshan Prasarak Mandal's



# Mahatma Gandhi Arts, Science & Late N.P. Commerce College

ARMORI Dist. Gadchiroli (M.S.)

With A Grade 3.02 CGPA

Accredited by NAAC Banglore

Affiliated to Gondwana University, Gadchiroli

# Department of Physical Education, Games & Sports

## Annual Report

## 2017-2018

# वार्षिक अहवाल शारिरीक शिक्षण व खेळ विभाग
# सत्र २०१७–१८

## ❖ २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन

२१ जून हा संपूण 'विश्वात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून २१ जुन, २०१७ ला महात्मा गांधी कला, विज्ञान आणि स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथे महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडाविभाग, राष्ट्रीय सेवा योजना, आणि पंतजली योग समिती आरमोरी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील क्रीडा संकुलनात योग शिबिराचे आयोजन मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी यांच्या अध्यक्षत`खाली करण्यात आले. या शिबिराला पंतजली योग समिती आरमोरीचे योग प्रशिक्षक डॉ. राम राऊत यांनी योगाचे सुयोग्य प्रशिक्षण देवून मार्गदर्शन केले. त्यांनी या प्रसंगी योगाच्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक करून योगासनाचे महत्व पटवून दिले सर्वप्रथम योगशिबिराचे उद्घाटन दिपप्रज्वलीत करुन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी, प्रमुख अतिथी तहसीलदार मा. धनंजय धाईत साहेब, आरमोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक महेश पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, योग प्रशिक्षक व मार्गदर्शक डॉ. राम राऊत आणि शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडाविभाग संचालक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे उपस्थित होते.

योगप्रशिक्षक व मार्गदर्शक डॉ. रामराऊत यांनी योगसाधक श्री. धनंजय कांबळे व सौ. जयश्री राऊत यांच्या सहकार्याने योग शिबिरात उपस्थित असलेल्या ३५० शिबीरार्थ्यांना योगाचे धडे देऊन सर्वांकडून योग करवून घेतला. या योग शिबिरात आरमोरी येथील ज्येष्ठ नागरिक, पंतजली योग समिती आरमोरीतील विवीध विभागाचे पदाधिकारी,स्थानिक पोलीस स्टेशन आरमोरी येथील पोलिस कर्मचारी तसेच मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीतील समस्त विद्या शाखेतील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवायोजनेच`स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते. या शिबिराचे संचालन प्रा. नोमेश मेश्राम, डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले.





The Hitavada
22/06/17

**Mahatma Gandhi College, Armori**



Yoga camp at Mahatma Gandhi College, Armori.

ON THE occasion of International Yoga Day, a yoga camp was organised jointly by the NSS, Physical Education Department of the College and Patanjali Yog Samiti, Armori. Kishor Wanmali, President of Manoharbhai Shikshan Prasarak Mandal, Armori, presided over the programme which was guided by Dr Ram Raut, Yoga Trainer of Patanjali Yog Samiti. Training in yoga was given on the occasion.

Colleges in Vidarbha can send their news items on vidarbhaline@gmail.com

लोकमत समाचार
23-6-17



M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College ★ Armori ★

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ स्वातंत्र्य दिनाचा सोहळा

दि. १५ ऑगस्ट, २०१७ ला महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७० व्या वर्धापनदिनाच्या औचित्याने ध्वजारोहणाचा कार्यक्रम सकाळी ८.३० वाजता आयोजित करण्यात आला. मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी यांचे हस्ते ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. सर्वप्रथम महात्मा गांधीजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व  स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या पुतळ्यास मान्यवरांनी पूजन व माल्यार्पण केले. ध्वजारोहणानंतर एन.सी.सी. पथकाचे पथसंचालन हे आकर्षनाचे केंद्र होते. ध्वजारोहण कार्यक्रमाचे संचालन प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे व प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले.

ध्वजारोहण कार्यक्रमाला मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी, कार्याध्यक्ष श्री. अब्दुलभाईजी पंजवानी, श्री. नामदेवराव सोरते, श्री. उमाकांतजी वनमाळी, श्री. सोनबाजी निखारे, श्री. नादीरभाई पंजवानी, श्री. श्रीहरीजी नवघरे, श्री. दिपकराव बेहरे, श्री. ग. रा. वडपल्लीवार, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य साईनाथ अद्दलवार, सर्व विद्याशाखेचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, रासेयो प्रमुख डॉ. उत्तमचंद कांबळे, एन.सी.सी. कमांडर श्री. सी. पी. हजारे यांनी परिश्रम घेतले.





लोकशाही वार्ता - 18/08/17



महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी.

महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी : येथे स्वातंत्र्यदिनाचा ७० वा वर्धापनदिनी ध्वजारोहण किशोर वनमाळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष अब्दुलभाई पंजवानी, नामदेवराव सोरते, उमाकांत वनमाळी, सोनबाजी निखारे, नादीरभाई पंजवानी, श्रीहरी नवघरे, दीपक बेहरे, ग.रा. वडपल्लीवार, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्राचार्य साईनाथ अद्दलवार यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ महात्मा गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

दिनांक २९ ऑगस्ट २०१७ रोजी हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक प्रेम निर्माण व्हावा तसेच सामाजिक शांतता आणि जातीय सलोख्याची भावना त्यांच्यात रूजावी हे उद्दिष्ट ठेवून स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथे सद्‌भावना दौडचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्‌घाटन समारंभाप्रसंगी अध्यक्ष म्हणून मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी, अतिथी आरमोरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. महेश पाटील, मा. अनिलजी सोमनकार, संस्थेचे पदाधिकारी मा. नामदेवरावजी सोरते, मा. दिपकजी बेहरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे उपस्थित होते.

यावेळी मा. किशोरभाऊ वनमाळी यांनी अध्यक्षीय भाषणातून युवक—युवतींना सद्‌भावना दौड स्पर्धेसाठी शुभेच्छा देत हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी क्रीडाक्षेत्रांत लौकिक प्राप्त करावा असे आवाहन केले. पोलीस निरीक्षक मा. महेश पाटील यांनी सद्‌भावना दौडचे आयोजन एकात्मतेचे प्रतीक असल्याचे सांगितले. यावेळी मा. किशोरभाऊ वनमाळी, मा. महेश पाटील आणि उपस्थित मान्यवरांनी सद्‌भावना दौड स्पर्धेला हिरवी झेंडी दिली.

सद्‌भावना दौड स्पर्धेत ८७० युवक—युवतींनी सहभाग नोंदविला. यात मुलींमधून ३ किमी दौडमध्ये **प्रथम** कु. दीक्षा देवाजी तिजारे बी. ए. भाग २, **द्वितीय** कु. रोहीणी अनिल जुआरे बी.एस्सी. भाग २ तर **तृतीय** कु. प्रतिक्षा बळीराम कोलते बी.एस्सी. गृहविज्ञान भाग १ तर ५ किमी दौडमध्ये मुलांमधून **प्रथम** धनीराम दारसू पदा बी.ए. भाग २, **द्वितीय** टाऊनकुमार होमराज घरत बी.ए. भाग २ तर **तृतीय** रूपेश चामारू मडावी बी.कॉम. भाग २ यांनी प्राप्त केले. सद्‌भावना दौड मधील यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी सद्‌भावना दौड स्पर्धेचे प्रास्ताविक करताना सद्‌भावना दौड ही केवळ दौड स्पर्धा नसून सामाजिक शांततेचे प्रतीक असणारी दौड स्पर्धा असल्याचे सांगितले. तसेच देशात परस्पर सौहार्द आणि शांतता नांदावी व विद्यार्थ्यांत क्रीडाविषयक आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने सद्‌भावना दौडचे आयोजन महाविद्यालयात मागील ५ वर्षापासून करण्यात येत असल्याचे स्पष्ट केले.सद्‌भावना दौडच्या उद्‌घाटन आणि बक्षीस वितरण समारंभाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी क्रीडा समिती प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. डॉ. मनोज ठवरे, महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी—विद्यार्थीनी, पोलीस पथक, उपजिल्हा रूग्णालय आरमोरीतील वैद्यकीय पथक यांनी परिश्रम घेतले.

M.G. Art's, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

# २९ ऑगष्ट २०१७ राष्ट्रीय क्रीडा दिन, सद्भावना दौड

उद्घाटन समारंभाप्रसंगी अध्यक्ष म्हणून मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी, अतिथी आरमोरी पोलीस स्टे पोलीस निरीक्षक मा. महेश पाटील, मा. अनिलजी सोमनकार, संस्थेचे पदाधिकारी मा. नामदेवरावजी सोरते, मा. दिपकजी बेहरे, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे

















लोकमत
३०-८-१७

आरमोरीत सद्भावना दौड : राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात, ८७० जणांनी घेतला सहभाग

## शेकडो युवक-युवती धावल्या

PRINCIPAL
M.G.Arts, Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Dist.Gadchiroli

## ❖ महात्मा गांधी महाविद्यालयात फुटबॉल स्पर्धा

दि. १५ सप्टेंबर २०१७ ला एकदिवसीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल फुटबॉल असोसिएशन (फिफा) द्वारा १७ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धा भारतात आयोजित केलेली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने लाखो खेळाडूंना फुटबॉल या खेळात सहभाग घ्यावा या उद्देशाने महाराष्ट्र फुटबॉल मिशन कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयात, शारीरिक शिक्षण, खेळ आणि क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फुटबॉल क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. खेळाच्या माध्यमातुन आंतरराष्ट्रीय एकात्मता निर्माण होते म्हणून खेळाचे महत्व प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी पटवून दिले. तर शारीरिक व मानसिक निकोप वाढीसाठी खेळ खेळले पाहिजे असे मत डॉ. रमेश ठोंबरे व डॉ. राजेंद्र घोनमोडे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी आयोजक शारीरिक शिक्षण आणि खेळ व क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. उत्तमचंद कांबळे उपस्थित होते. उद्घाटनीय कार्यक्रमानंतर प्राध्यापक विरूद्ध विद्यार्थी, प्राध्यापिका विरूद्ध विद्यार्थीनी असा प्रदर्शनीय सामना घेण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर व प्रा. प्रियदर्शन गणवीर यांनी केले तर आभार प्रा. पराग मेश्राम यांनी मानले.

### प्राध्यापिका विरूद्ध विद्यार्थीनी फुटबॉल स्पर्धा













# प्राध्यापक विरूद्ध विद्यार्थी फुटबॉल स्पर्धा









नवभारत - 17/09/17

## महात्मा गांधी कालेज में फुटबाल स्पर्धा



गड़चिरोली (का). फेडरेशन आफ इंटरनेशनल फुटबाल एसोसिएशन (फीफा) द्वारा अंडर 17 विश्वकप स्पर्धा भारत में आयोजित की गई है. जिसके मद्देनजर राज्य सरकार ने लाखों खिलाड़ी यह फुटबाल खेल में सहभाग ले इस उद्देश्य से महाराष्ट्र फुटबाल मिशन कार्यक्रम के तहत महाराष्ट्र स्तर पर आयोजित किए गए. कार्यक्रम के तहत आरमोरी के महात्मा गांधी कला, विज्ञान व न.पं. वाणिज्य महाविद्यालय में एक दिवसीय फुटबाल स्पर्धा आयोजित की गई. शारीरिक शिक्षा, खेल विभाग व राष्ट्रीय सेवा योजना के संयुक्त तत्वावधान में आयोजित क्रीड़ा स्पर्धा का उद्घाटन प्राचार्य डा. लाल सिंह खालसा ने किया. इस दौरान प्रभारी प्राचार्य डा. रमेश ठोंबरे, प्रभारी प्राचार्य डा. राजेंद्र घोनमोडे उपस्थित थे. इस समय प्राध्यापक व छात्र तथा प्राध्यापिका व छात्राओं में मैच हुई.

देशोन्नती - 16/09



महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

**गांधी महाविद्यालय आरमोरी**- येथील स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. खालसा यांनी केले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ.रमेश ठोंबरे, प्रभारी प्रचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे उपस्थित होते. आयोजन क्रिडा विभाग प्रमुख प्रा.ज्ञानेश्वर ठाकरे, रासेयो योजना प्रमुख डॉ. कांबळे यांनी केले यावेळी प्राध्यापक विरुध्द विद्यार्थी, प्राध्यापिका विरुध्द विद्यार्थीनी, असा प्रदर्शनीय सामना घेण्यात आला.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College, Armori

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late,N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री (महिला) स्पर्धेत सांघिक विजेतेपद

दि. १९ सप्टेंबर २०१७ ला झालेल्या गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारा आयोजित जनता महाविद्यालय, चंद्रपूर येथे आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री दौड स्पर्धेत महिलांच्या ५ किलोमीटर शर्यतीत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी या महाविद्यालयाने सलग चार वर्षापासून सांघिक विजेतेपद कायम ठेवले आहे. कु. गीता वाटगुरे हिने ५ किलोमीटर शर्यत पूर्ण करीत पहिले स्थान पटकाविले, कु. दिक्षा तिजारे हिने तृतीय क्रमांक प्राप्त करीत महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरीला यावर्षीही सांघिक विजेतेपदाचा बहुमान मिळवून दिला. महात्मा गांधी महाविद्यालयातर्फे ५ किलोमीटर दौड स्पर्धेत कु. गीता वाटगुरे, दिशा तिजारे, कु. रोहीणी जुआरे, कु. सोनाली हेमके, कु. अश्विनी मोहुर्ले, कु. माधुरी धोटे, कु. प्रतिक्षा कोलते यांनी सहभाग घेतला. तसेच पुरूषांच्या १२.५ किलोमीटर दौड स्पर्धेत विकास तुमराम याने १० वा क्रमांक प्राप्त केला तर धनीराम पदा याने ११ वा क्रमांक प्राप्त केला. पुरूषांच्या १२.५ किलोमीटर दौड स्पर्धेत विकास तुमराम, धनीराम पदा, सुरज पडोले, महेंद्र मने, रूपेश मडावी यांनी सहभाग घेतला.
















दैनिक पुण्यनगरी दि. २७/९/१७

### महात्मा गांधी महाविद्यालयाचे सुयश



आरमोरी : गोंडवाना विद्यापीठ द्वारा आयोजित जनता महाविद्यालय चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन क्रॉसकंट्री स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयाने सुयश प्राप्त केले. गीता वाटगुरे हिने ५ किमी शर्यत पूर्ण करून प्रथम क्रमांक पटकाविला. दीक्षा तिजारे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. महात्मा गांधी महाविद्यालयातर्फे ५ किमी दौड स्पर्धेत गीता वाटगुरे, दीक्षा तिजारे, रोहिणी जुआरे, सोनाली हेमके, अश्विनी मोहुर्ले, माधुरी धोटे, प्रतीक्षा कोलते तसेच पुरुषांच्या १२.५ किमी दौड स्पर्धेत विकास तुमराम याने १० वा क्रमांक प्राप्त केला. तर धनीराम पदा याने ११ वा क्रमांक प्राप्त केला. विजेत्या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष किशोर वनमाळी, कार्याध्यक्ष अब्दुल पंजवानी, संस्थेचे सदस्य, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. प्रियदर्शन मणवीर आदींनी अभिनंदन केले. व आंतर विद्यापीठ अखिल भारतीय क्रॉसकंट्री दौड स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G. Arts, Science &
Late N.P. Commerce College
ARMORI, Distt. Gadchiroli

## ❖ गोंडवाना विद्यापीठस्तरीय आंतर महाविद्यालयीन बॉस्केटबॉल स्पर्धेत प्रथम

दिनांक २२ सप्टेंबर २०१७ ला आयोजित गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी येथे आंतरमहाविद्यालयीन बॉस्केटबॉल स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

बॉस्केटबॉल या स्पर्धेत मागील पाच वर्षेपासुन चॅम्पियनशिप असलेल्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपूरी संघाविरूद्ध महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी यांच्यादरम्यान अत्यंत चुरशिचा असा हा अंतिम सामना झाला. या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाकडून अश्विन बांबोळे, रोशन धोटे, पलाश मेश्राम, गणेश गेडाम, सौरभ गोंदोळे, रूपेश मेश्राम आदिंनी विशेष परिश्रम करीत महाविद्यालयाला बॉस्केटबॉल स्पर्धेचे विजेतेपद प्राप्त करून दिले आहे. या स्पर्धेत अश्विन बांबोळे, रोशन धोटे आणि अतुल गेडाम यांनी अप्रतिम अशी कामगिरी करीत महाविद्यालयाला बॉस्केटबॉल स्पर्धेमध्ये विजेतेपदाचा दावेदार असल्याचा बहुमान मिळवून चॅम्पीयनशिप प्राप्त करुन दिले आहे.







दैनिक भास्कर - 14/10/17



**बास्केटबॉल स्पर्धा में महात्मा गांधी महाविद्यालय प्रथम**

संवाददाता। आरमोरी.

गोंडवाना विश्वविद्यालय गढ़चिरोली अंतर्गत डा. बाबासाहब आंबेडकर महाविद्यालय ब्रम्हपुरी में हाल ही में आयोजित अंतरमहाविद्यालयीन बास्केटबाल स्पर्धा में महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी ने प्रथम स्थान प्राप्त किया। इस स्पर्धा में नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपुरी विरुद्ध महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी के बीच अंतिम मैच हुआ। इस स्पर्धा में महात्मा गांधी महाविद्यालय की ओर से अश्विन बाबोंले, रोशन धोटे, पलाश मेश्राम, गणेश गेडाम, सौरभ गोंदोले, रूपेश मेश्राम का समावेश है। इन सफल खिलाड़ियों का किशोर वनमाली, अब्दुलभाई पंजवानी, संस्था के सदस्य, प्राचार्य डा. लालसिंग खालसा, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. मनोज उईके समेत अन्य प्राध्यापकों ने अभिनंदन किया है।

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन खो–खो (महीला/पुरुष) झोन 'अ' स्पर्धा

दि. २७ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०१७ या कालावधीत गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत महात्मा गांधी कला विज्ञान व स्वं नं पं वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथे झालेल्या गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन **खो–खो पुरूष व महीला झोन अ** गटाचे सामने घेण्यात आले. या स्पर्धेत एकुण ३७ संघांनी सहभाग घेतला

खो–खो स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, उपप्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, शारीरिक शिक्षण आणि खेळ व क्रीडा विभागाचे संचालक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. डॉ. विवके मुरकुटे, प्रा. डॉ. राजू चावके, प्रा. डॉ. रॉय, प्रा. डॉ. जोशी, प्रा. डॉ. रंधये, प्रा. डॉ. नागलवाडे प्रा.डॉ. मनोज ठवरे आदी उपस्थित होते. झोन 'अ' **पुरूष गटात** महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरीचा संघ प्रथम तर गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. **महिला गटात** गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा यांनी प्रथम क्रमांक तर आदर्श महाविद्यालय वडसा यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

गोंडवाना विद्यापीठ खो–खो झोन 'अ' व झोन 'ब' मध्ये झालेल्या अंतीम स्पर्धेत पुरूष गटात विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती विरूद्ध महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी या संघाविरूद्ध अंतिम सामना खेळण्यात आला. अतिशय चुरशीच्या झालेल्या सामन्यात **पुरूष गटात** प्रथम क्रमांक विवेकानंद महाविद्यालय भद्रावती, द्वितीय क्रमांक महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी तर तृतीय क्रमांक गोविदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा यांनी प्राप्त केला. **महीला गटात** प्रथम क्रमांक गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय, द्वितीय क्रमांक आनंदनिकेतन महाविद्यालय वरोरा तर तृतीय क्रमांक आदर्श महाविद्यालय देसाईगंज वडसा यांनी प्राप्त केला. प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोज ठवरे तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. प्रकाश पंधरे, श्री. मंगेश मैदुरकर, श्री. मधुकर चापले, श्री. महेश उरकुडे, श्री. प्रवीण बारसागडे, श्री. रूपेश मेश्राम, श्री. प्रशांत दडमल तसेच महाविद्यालयातील वरीष्ठ खेळाडू यांनी विशेष परिश्रम घेऊन स्पर्धा यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले.






**खो–खो स्पर्धेचे उदघाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना तसेच खो–खो संघाशी हस्तांदोलन करतांना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रा. डॉ. रमेश ठोंबरे, डॉ.मनोज अरमरकर, डॉ. विवेक मुरकूटे, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. मनोज ठवरे**





PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडु सोनाली हेमके हिचा सत्कार करतांना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, डॉ रमेश ठोंबरे डॉ. विवेक मुरकूटे, डॉ. नागलवाडे, डॉ.राजु चावके, डॉ. रॉय, प्रा. मुन्ना रुखमोडे, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे,प्रा. शशिकांत गेडाम व मनोज ठवरे








आंतर महाविद्यालीन खो–खो पुरुष उपविजेता संघ महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी
बक्षिस वितरण करतांना मा.प्रा. डॉ किशोर ठाकरे,.प्रा. कलोडे, प्रा. डॉ. राजेंद्र घोनमोडे, डॉ.रंधये,
डॉ. विवेक मुरकूटे, डॉ. नागलवाडे, डॉ.राजु चावके, डॉ. रॉय, प्रा. मुन्ना रुखमोडे, प्रा. उदय मेंडूलकर प्रा.ज्ञानेश्वर ठाकरे

लोकमत
17 - 10 - 17

# खो-खो स्पर्धेत ३७ संघ सहभागी

## आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा : महात्मा गांधी कॉलेज विजेता तर मुनघाटे महाविद्यालय उपविजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

आरमोरी : गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथे पार पडलेल्या विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन खो- खो पुरुष/ महिला झोन 'अ' चे सामने घेण्यात आले. या स्पर्धेत एकूण ३७ संघांनी भाग घेतला. या स्पर्धेत पुरुष गटात महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरीचा संघ विजेता तर गोविंदराव मुनघाटे महाविद्यालय कुरखेडाचा संघ द्वितीय ठरला. महिला गटात मुनघाटे महाविद्यालय कुरखेडा प्रथम तर आदर्श महाविद्यालयाचा संघ द्वितीय ठरला.

खो- खो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी



विजेत्या संघासमवेत महाविद्यालयाचे शिक्षक.

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, शारीरिक शिक्षण आणि खेळ व क्रीडा विभागाचे संचालक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. डॉ. विवेक मुरकुटे, प्रा. डॉ. राजू चावके, प्रा. डॉ. रॉय, प्रा. डॉ. जोशी, प्रा. डॉ. रंधये, प्रा. डॉ. नागलवाडे उपस्थित होते.

खो- खो झोन अ व झोन ब मध्ये पुरुष व महिला यांच्या सामन्यात पुरुष गटात विवेकानंद महाविद्यालय भद्रावती विरुद्ध महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी या संघात अंतिम सामना खेळविण्यात आला. स्पर्धेचे बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. किशोर ठाकरे, प्रा. डॉ. मनोहर कल्होडे, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, शशिकांत गेडाम, प्रा. डॉ. विवेक मुरकुटे, प्रा. डॉ. चावके उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. मनोज ठवरे तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. यशस्वितेसाठी प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. प्रकाश पंधरे, मंगेश मैदुरकर, मधुकर [illegible], महेश उरकुडे, प्रवीण बार[illegible], रुपेश मेश्राम, प्रशांत [illegible] व महाविद्यालयातील खेळाडूंनी सहकार्य केले.

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

M.G. Arts ... Late N.P. Commerce College ★ Armori ★

## ❖ गोंडवाना विद्यापीठ बॉक्सिंग संघात स्वप्नील डांगे या विद्यार्थ्याची निवड

दि. १८ ते २५ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत पंजाब विद्यापीठ, चंदीगढ येथे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिंग (पुरूष) स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयातील विद्यार्थी स्वप्नील डांगे याने गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघातर्फे सहभाग घेतला होता.


देशोन्नती

23-11-17

गोंडवाना विवि की बाक्सिंग टीम में स्वप्निल

आरमोरी (सं). महात्मा गांधी, विज्ञान व न.पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी का छात्र स्वप्निल डांगे का चयन गोंडवाना विश्वविद्यालय की बाक्सिंग टीम में किया गया. अखिल भारतीय अंतर विवि बाक्सिंग (पुरुष) स्पर्धा पंजाब विवि, चंडीगढ़ में वह हिस्सा लेगा. स्वप्निल का मनोहरभाई शिक्षा प्रसारक मंडल के अध्यक्ष किशोर वनमाली, कार्याध्यक्ष अब्दुल पंजवानी, संस्था के सदस्य, महाविद्यालय के प्राचार्य डा. लालसिंह खालसा, शारीरिक शिक्षा व क्रीड़ा प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, क्रीड़ा विभाग के सदस्य प्रा. प्रियदर्शन गणवीर व महाविद्यालय के सभी प्राध्यापकों ने अभिनंदन किया.

## ❖ आंतर महाविद्यालयीन वार्षिक ॲथलेटीक्स स्पर्धेत पदकांची लूट

दि. १७ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०१७ ला गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत महिला महाविद्यालय, गडचिरोली व्दारा आयोजित आंतर महाविद्यालयीन वार्षिक ॲथेलेटिक्स दौड स्पर्धेत महाविद्यालयतर्फे कु. दिक्षा तिजारे, कु. अश्विना मोहुर्ले, कु. रोहीणी जुआरे, माधुरी धोटे, धनीराम पदा, विकास तुमराम यांनी सहभाग घेतला.

**वैयक्तिक स्पर्धेत** कु. दिक्षा तिजारे हिने १५०० मीटर दौड स्पर्धेत सुवर्ण पदक, ८०० मीटर दौड स्पर्धेत सुवर्ण पदक, ५००० मीटर दौड स्पर्धेत रौप्य पदक, कु. अश्विना मोहुर्ले हिने ४०० मीटर दौड स्पर्धेत सुवर्ण पदक, कु. रोहिणी जुआरे हिने ४०० मीटर दौड स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केले.

**सांघिक** रिले या स्पर्धेत ४x४०० मीटर मध्ये कु. अश्विना मोहुर्ले, कु. दिक्षा तिजारे, कु. रोहीणी जुआरे, कु. माधुरी धोटे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले तर ४x१०० मीटर रिले स्पर्धेमध्ये कु. अश्विना मोहुर्ले, कु. दिक्षा तिजारे, कु. रोहीणी जुआरे, कु. माधुरी धोटे यांनी रौप्य पदक प्राप्त केले.


देशोन्नती

28-11-17

ॲथलेटिक्स स्पर्धेत म. गांधी महाविद्यालयाच्या खेळाडूंची भरारी

तालुका प्रतिनिधी /२७ नोव्हेंबर

सांघिक रिले स्पर्धेत अश्विनी मोहुर्ले, दिक्षा तिजारे, रोहिणी जुआरे, माधुरी धोटे यांनी

PRINCIPAL
M.G.Arts.Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ युवारंग वार्षिक क्रीडा व सांस्कृतीक महोत्सव २०१७–१८

दि. २४ जानेवारी ते २६ जानेवारी २०१८ ला महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पंजवानी वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील सांस्कृतिक विभाग व शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'युवारंग क्रीडा व सांस्कृतिक' संमेलनाचे उद्घाटन मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. किशोरभाऊ वनमाळी यांनी केले. उद्घाटन सोहळ्यात अध्यक्ष म्हणून मा. किशोरभाऊ वनमाळी, उद्घाटक म्हणून प्रसिद्ध सिने कलावंत मा. सपना मोरे, प्रमुख अतिथी म्हणून झाडीपट्टीतील प्रख्यात खलनायक मा. दीपककुमार मेश्राम, प्रसिद्ध नाट्यकलावंत मा. अमितकुमार रामटेके, ज्येष्ठ नाट्यकलावंत मा. गणपतराव वडपल्लीवार, मा. नामदेवरावजी सोरते, मा. उमाकांतजी वनमाळी, मा. दीपकजी बेहरे, मा. नवघरे गुरुजी, मा. हरिश्चंद्रजी बोंदरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. अमिता बन्नोरे, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, विद्यार्थी परिषदेचे सचिव संतोष म्हशाखेत्री आदी मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना वाव मिळण्यासाठी युवारंगसारखे कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे सांगितले व आयोजनाची भूमिका विशद केली तसेच कला सादरीकरणाची संधी भेटल्यास संधीचा अवश्य लाभ घ्या, असे आवाहन केले. समारंभाचे संचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. सीमा नागदेव यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अमिता बन्नोरे यांनी मानले.

युवारंगचा शुभारंभ विविध क्रीडास्पर्धेने झाला त्यात १०० मी. दौड, क्रिकेट, डॉजबॉल, डिश डेकोरेशन, प्रासंगिक समूहनृत्य, एकलनृत्य, अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होता. यात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. युवारंग तीन दिवस चालणार असून दरम्यान विविध क्रीडा स्पर्धा तसेच वादविवाद, समूहनृत्य, एकपात्री अभिनय, एकांकिका, समूह गीत, प्रश्नमंजुषा, फॅशन शो, ऑक्रेस्ट्रा अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, सांस्कृतिक विभागाचे सदस्य प्रा. नोमेश मेश्राम, प्रा. पराग मेश्राम, डॉ. विजय रैवतकर, प्रा. प्रियदर्शन गणवीर, प्रा. स्नेहा मोहुर्ले, क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, क्रीडा विभागाचे सदस्य डॉ. मनोज ठवरे, तसेच प्रा. किशोर हजारे, प्रा. डॉ. विशाखा वंजारी, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. जयेश पापडकर, प्रा. छगन मुंगमोडे, प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, डॉ. उत्तमचंद कांबळे, डॉ. विजय गोरडे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. चंद्रकांत डोर्लीकर, डॉ. वसंता कहालकर, प्रा. गजानन बोरकर तसेच समस्त प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आणि खेळाला प्रोत्साहन आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग आणि क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने युवारंग क्रीडा व सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन दि. २४ ते २६ जानेवारी २०१८ पर्यंत करण्यात आले होते. या संमेलनाचा समारोप समारंभ नुकताच पार पडला. या समारोप समारंभाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रमुख अतिथी प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. अमिता बन्नोरे, आय. क्यु. ए. सी. समन्वयक प्रा. नोमेश मेश्राम, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभागप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. शशिकांत गेडाम आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

तीन दिवस साजरा करण्यात आलेल्या युवारंगचा शुभारंभ विविध क्रीडा स्पर्धेने झाला. त्यात १०० मीटर दौड स्पर्धा, डॉज बॉल, क्रिकेट, डिश डेकोरेशन, पुष्परचना, रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धांचा समावेश होता त्यात प्रामुख्याने 'राजकीय क्षेत्राच्या प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता आहे किंवा नाही' या विषयावर वादविवाद स्पर्धा, एकलनृत्य स्पर्धा, एकपात्री अभिनय स्पर्धा, समूहनृत्य स्पर्धा, समूह गीतगायन स्पर्धा, देशभक्तीपर नृत्य स्पर्धा, इंडोवेस्टर्न संस्कृतीचा प्रत्यय देणारे फॅशन शो, आनंद मेळावा अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सध्याच्या सामाजिक, राजकीय वास्तवाचे भान देणारे, राष्ट्रीय एकात्मतेचा प्रत्यय देणारे समाजजागृतीपर एकांकिकांनी प्रेक्षकांचे मन हेलावून टाकले, रंगतदार नृत्यांनी प्रेक्षकांचे मन जिंकले. फॅशन शो हे आकर्षणाचे केंद्र होते. ऑक्रेस्ट्राद्वारे विद्यार्थ्यांनी बहारदार गीत सादर करून सर्वांचेच मन जिंकले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी युवारंग क्रीडा व सांस्कृतिक संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आनंद व्यक्त केले व विद्यार्थ्यांनी विविध कलेच्या क्षेत्रात आपल्या प्रतिभेने पुढे येण्याचे आवाहन केले. कलाक्षेत्रात पुढे येण्याचे युवारंग हे सुंदर कलापीठ असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संचालन प्रा. कविता खोब्रागडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अमिता बन्नोरे यांनी मानले. युवारंग क्रीडा व सांस्कृतिक संमेलनाच्या यशस्वी आयोजनाकरिता सांस्कृतिक विभागाचे सदस्य, क्रीडा विभागातील सदस्य, महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक, विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College * Armori *

PRINCIPAL
M.G.Arts.Science &
Late,N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

# युवारंग वार्षिक क्रीडा व सांस्कृतीक महोत्सव २०१७–१८



म. शि. प्र. म अध्यक्ष किशोरभाऊ वनमाळी मार्गदर्शन करतांना.




प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद



१०० मि. धावणे




क्रिकेट स्पर्धा प्राध्यापकवृंद विरुध्द विद्यार्थी



डॉजबॉल स्पर्धा विद्यार्थीनी



डॉजबॉल प्राध्यापिका विरुध्द विद्यार्थीनी





PRINCIPAL
M.G.Arts.Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli
















दैनिक भास्कर
4-2-18

## क्रीड़ा व सांस्कृतिक कार्यक्रमों के साथ मनाया 'युवारंग'



संवाददाता | आरमोरी

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. नपं वाणिज्य महाविद्यालय में विद्यार्थियों के कलागुणों को व खेल को प्रोत्साहन देने व उन्हें प्रेरणा देने के लिए महाविद्यालय के सांस्कृतिक विभाग व क्रीड़ा विभाग के संयुक्त तत्वावधान में युवारंग क्रीड़ा व सांस्कृतिक सम्मेलन का आयोजन हाल ही में किया गया था। इस सम्मेलन के समापन कार्यक्रम की अध्यक्षता प्राचार्य डा. लालसिंग खालसा ने की। प्रमुख अतिथि के रूप में प्रभारी प्राचार्य डा. रमेश ठोंबरे, प्रभारी प्राचार्य डा. [illegible] घोनमोड़े, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. नोमेश मेश्राम, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. शशिकांत गेडाम आदि उपस्थित थे। तीन दिवसीय इस युवारंग का शुभारंभ विभिन्न क्रीड़ा स्पर्धाओं के साथ हुआ। इसमें 100 मीटर दौड़ स्पर्धा, डॉज बॉल क्रिकेट, डिश डेकोरेशन, पुष्परचना, रंगोली स्पर्धा ऐसे विभिन्न स्पर्धा का समावेश था। इस सम्मेलन में विद्यार्थियों की कलाकृति को बढ़ावा देने के लिए विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया गया था। इसमें प्रमुखता से राजनीतिक क्षेत्र में प्रवेश के लिए शैक्षणिक पात्रता की आवश्यकता है [illegible] इस विषय पर वादविवाद स्पर्धा, एकलव्य नृत्य स्पर्धा, एकांकी अभिनय स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा, समूह गीतगायन स्पर्धा, देशभक्ति पर नृत्य स्पर्धा, आनंद मेळावा आदि विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया गया था। इस अवसर पर प्राचार्य डा. लालसिंग खालसा ने युवारंग क्रीड़ा व सांस्कृतिक सम्मेलन के सफल आयोजन पर खुशी व्यक्त की व विद्यार्थियों को विभिन्न कला के क्षेत्र में अपनी प्रतिभा सामने लाने का आह्वान किया। संचालन प्रा. कविता खोब्रागड़े व धन्यवाद ज्ञापन प्रा. डा. अमिता बन्नोरे ने किया। सफलतार्थ सांस्कृतिक विभाग के सदस्य, क्रीड़ा विभाग के सदस्य, महाविद्यालय के सभी प्राध्यापक व विद्यार्थियों ने परिश्रम किया।

लोकमत
5-2-18

## युवारंग महोत्सवाची सांगता

### क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम : आरमोरीत कलागुणांची उधळण



सांस्कृतिक स्पर्धेत समूह नृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

लोकमत न्यूज नेटवर्क

आरमोरी : येथील महात्मा गांधी कला विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालयात युवारंग- क्रीडा व सांस्कृतिक तीन दिवसीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनाचा समारोप [illegible] कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, डॉ. राजेंद्र घोनमोडे, प्रा. अनिता बन्नोरे, प्रा. नोमेश मेश्राम, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. शशिकांत गेडाम उपस्थित होते. तीन दिवशीय संमेलनात १०० मीटर दौड, डॉज बॉल, क्रिकेट, डिश डेकोरेशन, पुष्परचना, रांगोळी स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, एकलनृत्य, एकपात्री अभिनय स्पर्धा, समूह नृत्य, गीतगायन, फॅशन शो यासह विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यात फॅशन शो हे आकर्षणाचे केंद्र ठरले. तसेच आर्केस्ट्रामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी बहारदार गीते सादर केली. संचालन प्रा. कविता खोब्रागडे तर आभार प्रा. डॉ. अमिता बन्नोरे यांनी मानले. यशस्वितेसाठी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

PRINCIPAL
M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College
ARMORI, Distt. Gadchiroli

## ❖ गोंडवाना विद्यापीठ पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो–खो स्पर्धेत निवड

दि. ०२ जानेवारी ते ०६ जानेवारी २०१८ या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो–खो (पुरूष) स्पर्धा एस. आर. टी. एम. विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या खो–खो (पुरूष) स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीचा विद्यार्थी प्रमोद घरत, रूपेश मेश्राम यांनी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघातर्फे सहभाग घेतला आहे.



पुण्य नगरी

2-1-17

**आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी प्रमोद घरत, रूपेश मेश्राम यांची निवड**

आरमोरी : महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थी प्रमोद घरत, रूपेश मेश्राम यांची गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघातर्फे पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धा एस.आर.टी.एम. विद्यापीठ नांदेड येथे २ ते ६ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या खो-खो स्पर्धेत सहभाग घेणार आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष किशोर वनमाळी, कार्याध्यक्ष अब्दूल पंजवानी, संस्थेचे सदस्यगण, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. प्रियदर्शन गणवीर तसेच प्राध्यापकवृंदांनी अभिनंदन केले. व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## ❖ गोंडवाना विद्यापीठ पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बास्केटबॉल स्पर्धेत निवड

दि. ०४ डिसेंबर ते ०८ डिसेंबर, २०१७ या कालावधीत एम.एल. सुखोदिया विद्यापीठ, उदयपुर, राजस्थान येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (पुरूष) स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीचा विद्यार्थी, रोशन धोटे, अतुल गेडाम यांने सहभाग घेतला होता. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघातर्फे त्यांनी बॉस्केटबॉल स्पर्धेत सहभाग घेतला.



देशोन्नती

6-12-17

**पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ बॉस्केटबॉल स्पर्धेत म.गांधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड**

तालुका प्रतिनिधी /५ डिसेंबर

आरमोरी : महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयाचे विद्यार्थी रोशन धोटे, अश्विन बांबोळकर, अतुल गेडाम यांची गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघातर्फे पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बॉस्केटबॉल (पुरुष) स्पर्धा निवड झाली आहे. ही स्पर्धा उदयपुर येथील एम.एल सुखादिया विद्यापीठात होणार आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर वनमाळी, कार्याध्यक्ष अब्दुलभाई पंजवानी संस्थेचे सदस्यगण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, शारीरीक शिक्षण आणि क्रिडाप्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, क्रिडाविभागाचे सदस्य प्रा. प्रियदर्शन गणवीर तसेच महाविद्यालयातील समस्त प्राध्यापकांनी अभिनंदन केले. आणि पुढील होणाऱ्या आंतर विद्यापीठ अखिल भारतीय स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

M.G. Arts Science & Late N.P. Commerce College

PRINCIPAL
M.G.Arts.Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ पश्चिम विभागीय आंतरभारतीय विद्यापीठ इनडोअर हॉकी महिला स्पर्धेत निवड

दि. १९ ते २२ जानेवारी २०१८ या कालावधीत पश्चिम विभागीय आंतर भारतीय विद्यापीठ इनडोअर हॉकी (महिला) स्पर्धा पंजाबी विद्यापीठ, पतियाळा येथे इनडोअर हॉकी (महिला) स्पर्धेत . महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीची विद्याथीनी कु. जयश्री गोंदोळे, कु. अश्विनी गोंदोळे, कु. रोहिणी जुआरे यांनी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली संघातर्फे सहभाग घेतला होता.




लोकमत
7-1-18



**सोनाली हेमके, अश्विनी गोंदोळे, जयश्री गोंदोळे**

आरमोरी : स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयाची सोनाली हेमके, अश्विनी गोंदोळे, जयश्री गोंदोळे यांची गोंडवाना विद्यापीठाच्या महिला हॉकी संघात निवड झाली आहे. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ हॉकी स्पर्धा गुजरात राज्यातील वडोदरा येथे होत आहे.

## ❖ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स (महिला) स्पर्धेत निवड

दि. १२ ते १६ डिसेंबर २०१७ ला आचार्य नागार्जूना विद्यापीठ, नागार्जूनानगर, गुंटूर येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयातील कु. दिक्षा तिजारे, कु. रोहिणी जुआरे या विद्यार्थीनींची निवड झाली होती. गोडवाना विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून ह्या विद्यार्थीनींनी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ ॲथलेटिक्स सहभाग घेतला आहे.

Hitavada
15-12-17



**Mahatma Gandhi Mahavidyalaya, Armori**

TWO students of Mahatma Gandhi Mahavidyalaya, Armori, have been selected for the Inter-University Women Athletics contest to be held at Guntur shortly. Deeksha Tijare and Rohini Juware will be representing the Gondwana University in this contest. Kishorbhau Wanmali, President of the MSP Mandal, Abdulbhai Panjawani, Working President, Dr Lalsingh Khalsa, Principal, college teachers and the entire non-teaching staff have congratulated students on their success. The attributed their success to their trainer and the Principal.

Deeksha Tijare and Rohini Juware of Mahatma Gandhi College.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College, Armori

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late,N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## ❖ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री (महिला) स्पर्धेत निवड

दि. २७ ते ३० आक्टोंबर २०१७ ला बेळगांव विश्वेश्वरीया टेक्नॉलॉजी इन्स्टीटयुट विद्यापीठ, कर्नाटक येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत महाविद्यालयातील कु. दिक्षा तिजारे, कु. रोहिणी जुआरे कु. प्रतिक्षा कोलते या विद्यार्थीनींनी गोंडवाना विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

Hitavada
16-11-17


**Mahatma Gandhi College, Armori**

STUDENTS of Mahatma Gandhi College, Armori, cornered glory in the All India Cross Country race in women's 10 kms category. Diksha Tojare, Rohini Juare, Pratiksha Kolte had participated in the competition. Kishor Wanmali, President of Manoharbhai Shikshan Prasarak Mandal, Abdul Panjwani, Working President, members of the society, Dr Lalsingh Khalsa, Principal, Dnyaneshwar Thakre, Sports Chief, Priyadarshini Ganvir, member of Sports Department, other lecturers and teaching staff have congratulated the students for participating in the event.

Diksha Tijare — Pratiksha Kolate — Rohini Juare

## ❖ २१ व्या अश्वमेध महाराष्ट्र क्रीडा महोत्सव, दापोली स्पर्धेत खेळाडुंची निवड

दि. २७ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०१७ झालेल्या २१ व्या महाराष्ट्र क्रीडा महोत्सव, दापोली, जिल्हा रत्नागिरी येथे आयोजित २१ व्या आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत गोंडवाना विद्यापीठातील संघातर्फे महाविद्यालयातील खेळाडुंची विवीध खेळात निवड झाली होती. ॲथलेटीक्स महिला संघात सोनाली हेमके, दिक्षा तिजारे, रोहीणी जुआरे, माधुरी धोटे, खो–खो पुरूष संघात प्रमोद घरत, रूपेश मेश्राम, महिला संघात सोनाली हेमके, रोहीणी जुआरे, बॉस्केटबॉल संघात पुरूष संघात रोशन धोटे, अतुल गेडाम, तर महिला संघात पायल सपाटे या खेळाडुंनी सहभाग घेतला आहे.






खो–खो महीला व पुरुषांचा संघ प्रशिक्षक प्रा ज्ञानेश्वर ठाकरे व प्रा. उदय मेंडुलकर

लोकमत
6-12-17


छायांकित जिल्हा

**अश्वमेध स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड**

[illegible]

Hitavada
6-12-17


**Mahatma Gandhi Mahavidyalaya, Armori**

Excelling players of M G College, Armori.

THE players from Mahatma Gandhi Mahavidyalaya represented the Gondwana University in athletics, kho-kho and basketball event in 'Ashwamedh'. The inter-university competition was held at Dapoli in Ratnagiri district. The girls' athletics team comprised Sonali Hemke, Deeksha Tijare, Rohini Juare and Madhuri Dhote. The boys' kho-kho team included Pramod Gharat, Rupesh Meshram while girls team had Sonali Hemke and Rohini Juare. The basketball teams included Roshan Dhote, Ashwin Bambolkar and Atul Gedam. Payal Sapate was in the girls' basketball team. The players were congratulated by Kishor Vanmali, president of education society, Abdul Panjwani, working president, Principal Dr Lalsingh Khalsa, HoD Prof Dnyaneshwar Thakre, Priyadarshan Ganvir and Dr Manoj Thaware.

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## ❖ गोंडवाना विद्यापीठस्तरीय इनडोअर हॉकी महिला स्पर्धेत महाविद्यालय विजयी

गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपुर येथे दिनांक १३ जानेवारी २०१८ ला आयोजित आंतरमहाविद्यालयीन इनडोअर हॉकी महिला स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

महीला हॉकीच्या अंतीम स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी विरूद्ध नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपूरी याच्यात चुरशीचा सामना झाला. या स्पर्धेत महाविद्यालयातर्फे सोनाली हेमके, अश्विनी गोंदोळे, रोहीनी जुआरे, नेहा रासेकर, माधुरी धोटे आदिंनी यशस्वी झुंझ देत महाविद्यालयाला प्रथम क्रमांक प्राप्त करून दिला. अंतिम सामन्यात सोनाली हेमके १,जयश्री गोंदोळे हीने १ गोल, अश्विनी गोंदोळे हीने १ गोल करीत ३–१ अशी उत्कृष्ट कामगिरी करीत महाविद्यालयाला आजिक्यपद प्राप्त करुन दिले.








महीला हॉकीच्या अंतीम सामना महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी विरूद्ध नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपूरी



आंतरमहाविद्यालयीन इनडोअर हॉकी महिला स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्विकारतांना महाविद्यालयीन खेळाडु व प्रशिक्षक ज्ञानेश्वर ठाकरे

Hitavada
22-1-18

**Mahatma Gandhi College, Armori**



Winning Hockey team along with the coach, Lalsingh Khalsa, Principal and the teachers.

STUDENTS of Mahatma Gandhi College, Armori, brought laurels to the College in Inter-College Indoor Hockey (Female) competition held at Dr Ambedkar College, Chandrapur. The team played against the team of N H College, Bramhapuri, and won by 3-1. Sonali Hemke, Ashwini Gondole, Jayashree Gondole, Rohini Juaare, Madhuri Dhote and Neha Rasekar along with Prof Gyaneshwar Thakre represented the College for the competition. Kishor Wanmali, President of Manohar bhai Shikshan Prasarak Mandal, Anand Panwani, Lalsingh Khalsa, Principal of the College, Gyaneshwar Thakre, Head of Sports Department and others members of Sports Department named Prof Priyadarshan Ganvir, Prof Dr Mauli Thawre along with all the teaching and non-teaching [illegible] College congratulated the students for their success.

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late,N.P.Commerce College
ARMORI. Distt.Gadchiroli

## ❖ ८ व्या राष्ट्रीय महिला हॉकी स्पर्धेत सोनाली हेमके निवड

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरीची विद्यार्थीनी कु. सोनाली अनिल हेमके हीची ८व्या राष्ट्रीय हॉकी (महीला) स्पर्धेत निवड झाली होती. दि. २६ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत रॉची (झारखंड) येथे झालेल्या स्पर्धेत तिने महाराष्ट्र संघा कडून सहभाग घेतला आहे.










लोकमत
3-2-18



सोनाली हेमके

आरमोरी : येथील महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयाची सोनाली अनिल हेमके हिची आठव्या राष्ट्रीय हॉकी (महिला) स्पर्धेत निवड झाली. तिने यशाचे श्रेय संस्थाध्यक्ष किशोर वनमाळी, कार्याध्यक्ष अब्दुल पंजवानी, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांना दिले.

M.G. Arts, Science & Late N.P. Commerce College

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## ❖ विद्यापीठ स्तरीय ‘आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर’चे आयोजन

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथे शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली पुरस्कृत दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, उद्घाटक म्हणून सहायक पोलीस निरीक्षक श्री. महारूद्र परजने तर अतिथी म्हणून आरमोरी तहसीलचे तहसीलदार श्री. यशवंत धाईत, प्राचार्यश्री. विनोद धारगावे, उपविभागीय जन सेवक श्री. संदीप लांजेवार, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे,रासेयो प्रमुख डॉ. उत्तमचंद

दोन दिवस चालणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरात प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून मॅनेजर ऑपरेटर व मार्केटींग एस.एस.एस. असोसिएट्स नागपूर येथील श्री. मोझेश कोंडरा तसेच एन.जी.ओ. गडचिरोली येथील रेडक्रॉस ट्रेनर श्री. अविनाश चटगुलवार उपस्थित होते. यावेळी अविनाश चटगुलवार यांनी अपघात झाल्यावर प्राथमिक उपचार म्हणून बॅंडेज कसे बांधले पाहिजे व बॅंडेजच्या विविध प्रकारा विषयी माहिती दिली. तसेच अपघात दरम्यान येणाऱ्या आपत्तींवर मात कसे करता येईलते प्रात्याक्षिकासह सांगितले.

प्रशिक्षक श्री. मोझेश कोंडरा यांनी आगीमुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींवर मात कस े करता येईल यावर आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण स्वयंसेवकांना दिले. हे प्रशिक्षण देत असताना त्यांनी प्रात्याक्षिकासह आगीपासून बचाव कार्य करतानाच्या व्यवस्थापनाचे धडे दिले. याप्रसंगी भूकंप, पूर, ढगफूटी, वादळ, विजा, आग, वायूगळती, भूस्खलण, अपघात, फ्रॅक्चर, भाजणे, विंचूचावणे, सापचावणे अशा विविध नैसर्गिक आपत्तींना सक्षमपणे कसे सामोरे जाता येईल याची माहिती चित्रफितीद्वारे देण्यात आली. प्रास्ताविक डॉ. उत्तमचंद कांबळे, संचालनप्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, उद्घाटक म्हणून सहायक पोलीस निरीक्षक श्री. महारूद्र परजने तर अतिथी म्हणून आरमोरी तहसीलचे तहसीलदार श्री. यशवंत धाईत, प्राचार्य श्री. विनोद धारगावे, उपविभागीय जन सेवक श्री. संदीप लांजेवार, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. शशिकांत गेडाम, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे,रासेयो प्रमुख डॉ. उत्तमचंद कांबळे





श्री. अविनाश चटगुलवार एन.जी.ओ. गडचिरोलीचे रेडक्रॉस ट्रेनर बॅंडेजच्या विविध प्रकारा विषयी माहिती देतांना

PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late N.P.Commerce College
ARMORI

प्रशिक्षक व मार्गदर्शक म्हणून श्री. मोझेश कोंडरा मॅनेजर ऑपरेटर व मार्केटींग एस.एस.एस. असोसिएट्स नागपूर शिबीरातील विद्यार्थ्यांना आगी पासुन बचाव प्रशिक्षण देतांना













आपत्ती व्यवस्थापण प्रशिक्षक श्री अविनाश चेटगुलवार श्री मोझेश कोंड्रा यांचा मोमेंटो देवुन सत्कार व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा. श्री. महारूद्र परजने, तहसीलदार श्री. यशवंत धाईत प्रा. डॉ.राजेंद्र घोनमोडे प्रा.ज्ञानेश्वर ठाकरे प्रा. डॉ.उत्तमचंद कांबळे,प्राडॉ. गर्जेंद्र कढव, प्रा. गजानन बोरकर




लोकमत
24-2-18

# आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

आरमोरीत शिबिर : गोंडवाना विद्यापीठस्तरीय कार्यक्रम

PRINCIPAL
M.G.Arts Science &
Late N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

## ❖ राष्ट्रीय सेवा योजना एकक व उत्कृष्ठ कार्यक्रम अधिकारी पुरस्कार

**उत्कृष्ठ राष्ट्रीय सेवा योजना एकक** शिक्षण मंत्री डा विनोद तावडे, राज्यमंत्री, मा. सुधीर मुनगंटीवार वन व वित्त आदिवासी व वने तथा पालकमंत्री मां नां राजे अंम्ब्रीशराव आत्राम.मा. डॉ. एन व्ही. कल्याणकर कुलगुरु गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, अशोकजी नेते यांचे हस्ते पुरस्कार स्विकारतांना महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरीचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा,प्रा. शशिकांत गेडाम आणि प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे रासेयो कार्यक्रम अधिकारी




महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री डॉ. विनोद तावडे, राज्यमंत्री, मा. सुधीर मुनगंटीवार वन व वित्त आदिवासी व वने तथा पालकमंत्री मां नां राजे अंम्ब्रीशराव आत्राम. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे कुलगुरु मा. डॉ. एन व्ही. कल्याणकर,अशोकजी नेते यांचे हस्ते **उत्कृठ रासेयो कार्यक्रम अधिकारी पुरस्कार** स्विकारतांना महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी सपत्नीक पुरस्कार स्विकारतांना प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे व प्रियंका ज्ञानेश्वर ठाकरे




PRINCIPAL
M.G.Arts,Science &
Late.N.P.Commerce College
ARMORI, Distt.Gadchiroli

"RIGHT PLACE FOR BRIGHT FUTURE"
MANOHARBHAI SHIKSHAN PRASARAK MANDAL ARMORI'S
MAHATMA GANDHI ARTS, SCIENCE &
LATE NASARUDDINBHAI PANJWANI COMMERCE COLLEGE
ARMORI Dist. Gadchiroli (M.S.) 441 208
Affiliated to Gondwana University, Gadchiroli
Re-accredited by NAAC 'A' with 3.02 CGPA

PRINCIPAL
Dr. Lalsingh H. Khalsa
M. Sc., Ph. D.
Mob. No. 9422153197
E-mail:lalsinghkhalsa@yahoo.com

S.T.D.: 07137
Office: 266558/266043
Web: mgcollegearmori.ac.in
E-mail:mgcollege.armori@gmail.com

## Translation of Department of Physical Education and Sports and Sports

## Annual Report 2017-2018

### 21 June International Yoga Day

June 21 is being celebrated as 'International Yoga Day' on the occasion of International Yoga Day on 21st June, 2017, jointly by the Department of Physical Education, Games and Sports, the National Service Scheme, and Patanjali Yoga Committee Armori at the sports complex of Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori. Yoga Camp was organized under the chairmanship of Hon. Kishorbhau Wanmali, the President of Manoharbhai Shikshan Prasarak Mandal Armori. The camp was guided by the yoga instructor of Pantajali Yoga Samiti Armori, Dr. Ram Raut by giving proper training in yoga.

### National Sports Day Celebrated with Enthusiasm at Mahatma Gandhi College

The birthday of Major Dhyanchand, the magician of hockey is celebrated on 29th August 2017 as National Sports Day. On the occasion of National Sports Day, Sadbhavana Race was organized with the aim of instilling love for sports among the college students as well as inculcating a sense of social peace and ethnic harmony in them Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori.

On this occasion, Hon. Kishorbhau Wanmali in his presidential address wished the youth for the Sadbhavana Race and appealed to the students to follow the example of Major Dhyanchand, the magician of hockey.

Introducing the Sadbhavana Race, Dr. Lalsingh Khalsa, the principal of the college said that the Sadbhavana Race is not just a race but a race that symbolizes social peace. He also clarified that Sadbhavana Race has been organized in the college for the last 5 years with a view to create mutual harmony and peace in the country and to create interest in sports among the students.

### Football Competition at Mahatma Gandhi College

The one-day football tournament was organized on September 15, 2017. The Federation of International Football Associations (FIFA) has hosted the Under-17 World Cup in India. Against this backdrop, the Government of Maharashtra under the Maharashtra Football Mission program with the objective of making millions of players participate in the game of football, the inauguration of the organized football tournament is held in the presence of Dr. Lalsingh Khalsa, the Principal of the college by the Department of Physical Education, Games and Sports jointly with the National Service

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

Scheme in the college. Dr. Lalsingh Khalsa, the Principal of the college persuaded that the importance of sports is due to the fact that international unity is created through sports.

**Team Championship in Inter-College Crosscountry (Women's)**

Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori has retained the team title for four consecutive years in the women's 5 km race in the inter-college cross country race competition organized by Godwana University Gadchiroli on 19th September 2017 at Janata College, Chandrapur. Ms. Geeta Watgure completed the 5 km race and won the first place. Diksha Tijare finished third and gave the team title to Mahatma Gandhi College Armori again this year.

**First in Gondwana University Level Inter-College Basketball Tournament**

Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori topped the list in the inter-collegiate basketball competition organized on 22nd September 2017 under Gondwana University Gadchiroli at Dr. Babasaheb Ambedkar College, Bramhapuri.

**Gondwana University Inter-College Kho-Kho (Women / Men) Zone 'A' Competition**

Gondwana University Inter-College Kho-Kho Men and Women Zone 'A' group matches were held from 27th September to 30th September 2017 under Gondwana University Gadchiroli at Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori. A total of 37 teams participated in this competition.

In Zone 'A' Men's Group, Mahatma Gandhi College Armori's team came first and Govindrao Munghate College Kurkheda came second. In the women's category, Govindrao Munghate College, Kurkheda got first position and Adarsh College, Wadsa got second position.

In the final competition held between Gondwana University Kho-Kho Zone 'A' and Zone 'B ' Men's Group, Vivekananda College Bhadravati came first, Mahatma Gandhi College Armori came second and Govidrao Munghate College Kurkheda came third. In the women's category, Govindrao Munghate College came first, Anandniketan College Warora came second and Adarsh College Desaiganj Wadsa came third.

**Selection of Swapnil Dange in Gondwana University Boxing Team**

Swapnil Dange, a student of Mahatma Gandhi College, participated in the All India Inter University Boxing (Men's) Competition at Punjab University, Chandigarh from 18th to 25th November 2017 on behalf of Gondwana University Gadchiroli team.

**Loot of Medals in Inter-Collegiate Annual Athletics Competition**

In the inter-collegiate annual athletics race organized by Women's College, Gadchiroli from 17th November to 19th November 2017 under Godwana University Gadchiroli Ku. Diksha Tijare, Ku. Ashwina Mohurle, Ms. Rohini Juare, Madhuri Dhote, Dhaniram Pada, Vikas Tumram participated on behalf of the college.

In the individual competition, Ku. Diksha Tijare won gold medal in 1500m race, gold medal in 800m race, silver medal in 5000m race, Ku. Ashwina Mohurle wins gold medal in 400m race Rohini Juare won a silver medal in the 400 meters.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College
Armori, Dist - Gadchiroli

In the 4x400m team relay event, Ku. Ashwina Mohurle, Ms. Diksha Tijare, Ku. Rohini Juare, Ku. Madhuri Dhote won the gold medal while in the 4x100m relay, Ku. Ashwina Mohurle, Ms. Diksha Tijare, Ku. Rohini Juare, Ku. Madhuri Dhote won the silver medal.

**Selection in Gondwana University West Divisional Inter-University Kho-Kho Competition**

In Kho-Kho (Men's) competition held at West Divisional Inter-University Kho-Kho (Men) Competition S. R. T. M. University, Nanded from 02 January to 06 January 2018, the students of Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori Pramod Gharat, Rupesh Meshram have participated on behalf of Gondwana University Gadchiroli team.

**Selection in Gondwana University West Divisional Inter-University Basketball Tournament**

In West Divisional Inter-University Basketball (Men's) Tournament held at M.L. Sukhodia University, Udaipur, Rajasthan from 04 December to 08 December 2017, the students of Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College Armori Roshan Dhote, Atul Gedam had participated on behalf of Gondwana University Gadchiroli team.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# Annual Report of Physical Education Games and Sports 2016-17

# शारिरीक शिक्षण आणि खेळ व क्रिडाविभाग

## वार्षिक अहवाल २०१६–१७

❖ **'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा** ( दि. २१ जून २०१६)

२१ जून हा संपूर्ण विश्वात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा केला जात आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान आणि स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालय येथे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग आणि पतंजली योग समिती आरमोरी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील क्रीडा संकुलात योग शिबिराचे आयोजन मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. या शिबिराला पंतजली योग समिती आरमोरीचे योगप्रशिक्षक डॉ. राम राऊत यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी या प्रसंगी योगाचे महत्त्व उपस्थितांना पटवून देत असताना योगाच्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक उपस्थितांना करून दाखविले. तसेच योगाचे सुयोग्य प्रशिक्षण दिले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी, प्रमुख अतिथी आरमोरी तहसील कार्यालयाचे तहसीलदार मा. मनोहरराव वलथरे साहेब, पोलीस स्टेशन आरमोरी येथील पोलीस निरिक्षक मा. महेश पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसाउपस्थित होते. याप्रसंगी पंतजली योग समिती आरमोरीतील पदाधिकारी व प्रशिक्षक यांनी या योगशिबिरात उपस्थित समस्तीयांना योगधडे देऊन सर्वांकडून योग करवून घेतला. या योगशिबिरात आरमोरी येथील ज्येष्ठनागरिक, आरमोरी तहसिल कार्यालय, स्थानिक पोलीस स्टेशन, पंचायत समिती, ग्रामपंचायत आरमोरी, प्रभात मित्र मंडळ, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आरमोरी, उपजिल्हा रूग्णालय आरमोरी येथील समस्त पदाधिकारी व कर्मचारी तसेचमनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीतील समस्त विद्याशाखेतील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, रा. से. यो. स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते. या शिबिराचे संचालन डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले.

❖ **पतंजली योग शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन** (दि. १९ जुलै २०१६)

कार्यक्रमाचे आयोजन महात्मा गांधी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, पतंजली योग समिती गडचिरोली, भारत स्वाभिमान संघटना गडचिरोली, किसान पंचायत, युवा भारत यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ जुलै २०१६ ला योग शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

योग हे जीवनदर्शन आहे, व्याधीमुक्त होऊन समाधीपर्यंत पोहचण्याचा योग सुंदर मार्ग असून योग सुखी व समृद्ध जीवनाचा राजमार्ग असल्याचे श्री. विष्णुजी भुतडा, महाराष्ट्र राज्य प्रभारी पतंजली योग समिती यांनी व्यक्त केले. ते कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून योग शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. यावेळी त्यांनी मानवी जीवनात योगाचे असणारे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी, अतिथी मा. अखिलभाईजी खान अध्यक्ष महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीचे बी.सी.यु.डी. चे संचालक डॉ. श्रीरामजी रोकडे, प्रांत संघटन मंत्री मा. विमलजी कास्टिया, पूर्वविदर्भाचे मंडळ प्रभारी राजकुमार पाठक, लातुर जिल्हा योगप्रसारक डॉ. व्यंकटेश सिद्धेश्वरी, जिल्हा महिला प्रभारी डॉ. सुधाताई सेता, श्री. भगवान पालकर, श्री. बाबासाहेब सुर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य साईनाथ अद्दलवार, श्री. अशोक पोरेड्डीवार, श्री. सत्यनारायणजी चकिनारपुवार, श्री. सत्यनारायण अनमदवार, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभागाचे संचालक प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या समारंभाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष मा. किशोरभाऊ वनमाळी यांनी योग आणि आयुर्वेदाचे जीवनात असणारे महत्त्व सांगताना योग म्हणजे जीव व ईश्वर यांचा संयोग असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सृजनात्मकता, गुणात्मकता आणि सकारात्मकतेच्या विकासाचे श्रेष्ठ माध्यम योग कसे आहे हे आपल्या अध्यक्षीय भाषणातुन व्यक्त केले. उद्घाटन समारंभाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी योग शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेची भूमिका व्यक्त केली. त्यांनी महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी योगशिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट करून भविष्यात योगशिक्षण आधारित सर्टिफिकेट कोर्स सुरू करण्याचा मानस व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी केले तर आभार श्री. अशोक पोरेड्डीवार यांनी मानले.

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

यांनी केले.याप्रसंगी आरमोरी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक महेश पाटील,डॉ प्रमोद गवई,तालुका होमगार्ड समादेशक श्री. अनिल सोमनकर, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

### ❖ गोंडवाना विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेत महात्मा गांधी महाविद्यालयाला सुवर्ण पदक(दि.१४/०९/२०१६)

गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत विवेकानंद महाविद्यालय भद्रावती द्वारा आयोजित चंद्रपूर येथील क्रीडा संकुलनात दिनांक १४ सप्टेंबर २०१६ ला झालेल्या आंतर महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथील ९० ते ९४ किलो वजनगटात वाल्मीक नवघरे आणि ६० ते ६४ किलो वजनगटात स्वप्नील डांगे या विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक प्राप्त केला.

### ❖ गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन बॉस्केटबॉल स्पर्धेत द्वितीय (दि.२२/०९/२०१६)

गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, ब्रम्हपूरी येथे दिनांक २२ सप्टेंबर २०१६ ला आयोजित आंतरमहाविद्यालयीन बॉस्केटबॉल स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी या महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेत नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपूरी विरूद्ध महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी यांच्यादरम्यान अंतिम सामना झाला. या स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाकडून सौरभ डांगे, प्रतिक जुआरे, तुषार धंदरे, रूपेश मने, अभिजीत चंदेल, मनोज हजारे, सौरभ गोंदोळे, शुभम जुआरे आदिंनी विशेष परिश्रम करीत महाविद्यालयाला द्वितीय क्रमांक प्राप्त करून दिला. या झालेल्या स्पर्धेत सौरभ डांगे आणि तुषार धंदरे यांनी अप्रतिम कामगिरी केली.

### ❖ गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन खो–खो (महिला) स्पर्धेत –तृतीय(दि.१०/१०/२०१६)

गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती येथे दि. १० ऑक्टोबर २०१६ रोजी झालेल्या गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन महिलांच्या खो–खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत आनंद निकेतन, वरोरा व महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी यांच्यात तृतीय क्रमांकासाठी सामना झाला. या सामन्यात महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी या महाविद्यालयाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी या संघातर्फे अश्विना मोहुर्ले हिने ०४ मिनीट खेळून ०३ गडी बाद केले तर रोहिणी जुआरे हिने ०३ मिनीट खेळून ०३ गडी बाद करीत महाविद्यालयाला या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून दिला. महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी या संघातर्फे अश्विना मोहुर्ले, रोहिणी जुआरे, नयना तडसे, पुजा दुमाने, जयश्री गोंदोळे, कोमल कानतोडे, दिक्षा तिजारे, माधुरी धोटे, रस्वीना राऊत, कोमल नारनवरे, अश्विनी सेलोकर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.

### ❖ गोंडवाना विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन खो–खो (पुरूष) स्पर्धेत आजिंक्यपद (दि. १४/१०/२०१६)

गोडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव येथे दि. १४ ते १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन खो–खो पुरूष स्पर्धेत महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी या महाविद्यालयाने यश संपादन करीत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा विरूद्ध महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी या संघाविरूद्ध अंतिम सामना खेळण्यात आला. अतिशय चुरशीच्या या सामन्यात महात्मा गांधी महाविद्यालयाने आनंद निकेतन वरोरा या संघावर ०३ गुणांनी मात करून यश संपादन केले. महात्मा गांधी महाविद्यालयातर्फे मनोज हजारे याने ०३ गडी बाद करून ०४ मिनीट खेळी केली तसेच प्रमोद वाघ याने ०२ गडी बाद करून ०२ मिनीटे ३० सेकंद खेळी करीत महाविद्यालयाला विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका पार पाडली.

### ❖ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी ॲथलेटीक्स स्पर्धेत चमकदार कामगिरी (दि १४/१०/२०१६)

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली अंतर्गत महिला महाविद्यालय, गडचिरोली येथे दि.१५ आक्टों,ते १७ आक्टो.२०१६ ला आयोजित गोंडवाना विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन वार्षिक ॲथेलेटिक्स दौड स्पर्धेत महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी अनिल नैताम, कु. गीता वाटगुरे, कु. सोनाली हेमके, कु. अश्विना मोहुर्ले, कु. रोहीणी जुआरे, कु. दिक्षा तिजारे यांनी सहभाग घेतला होता.

वैयक्तिक स्पर्धेत कु. गीता वाटगुरे हिने ५००० मीटर दौड स्पर्धेत सुवर्ण पदक, १०००० मीटर दौड स्पर्धेत रौप्य पदक, ८०० मीटर दौड स्पर्धेत रौप्य पदक, कु. सोनाली हेमके हिने १०० मीटर दौड स्पर्धेत सुवर्ण पदक, २०० मीटर दौड स्पर्धेत रौप्य पदक, कु. दिक्षा तिजारे हिने १५०० मीटर दौड स्पर्धेत सुवर्ण पदक, ५०० मीटर दौड स्पर्धेत कास्य पदक, कु. अश्विना मोहुर्ले हिने ४०० मीटर दौड स्पर्धेत रौप्य, २०० मीटर दौड स्पर्धेत कास्य पदक प्राप्त केले तसेच अनुप नैताम याने गोळाफेक या स्पर्धेत कास्य पदक प्राप्त केले.

सांघिक खेळात रिले या स्पर्धेत ४x४०० मीटर मध्ये कु. गीता वाटगुरे, कु. अश्विना मोहुर्ले, कु. दिक्षा तिजारे, कु. रोहीणी जुआरे यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले तर ४x१०० मीटर रिले स्पर्धेमध्ये कु. सोनाली हेमके, कु. अश्विना मोहुर्ले, कु. दिक्षा तिजारे, कु. रोहीणी जुआरे यांनी रौप्य पदक प्राप्त केले.

